# मुंबई विद्यापीठ

परीक्षा नियंत्रकांचे कार्यालय,
महात्मा जोतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई-४०००९८

क्र.परीक्षा/ प.नि./आयसीसी/ २ /२०१६

४ ऑक्टोबर, २०१६

## परिपत्रकः

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांचे संचालक / प्रमुख, विविध विद्या शाखांचे अधिष्ठाते, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहाय्यक कुलसचिव यांना या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी काही शिक्षक संघटनांचा सामुहीक रजा आंदोलनाचे पत्र प्राप्त झालेले आहे. तसेच वृत्तपत्रात देखिल सदर ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी सामुहीक रजेविषयी वृत्त प्रसिध्द झालेले आहे. सदर बाबतीत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना माननीय कुलगुरुंतर्फे अशी विनंती करण्यात येते की, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी ३३ वेगवेगळ्या परीक्षा २५० परीक्षा केंद्रांवर संपन्न होणार आहेत. सदर परीक्षा पुढे ढकलल्यास विद्यार्थी, पालक व समाजातील इतर घटकांवर विपरीत परीणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदर परीक्षा या पुन्हा नियोजित करण्यास समस्या होण्याची शक्यता आहे.

तरी सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना अशी विनंती करण्यात येते की, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी होणा-या परीक्षांकरीता त्यांनी आवश्यक व्यवस्था आपल्या महाविद्यालयात करावी व दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी होणा-या सर्व परीक्षा सुरळीत पार पाडण्याची दक्षता घ्यावी.

(दीपक वसावे)
स्थानापन्न परीक्षा नियंत्रक

प्रत :

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक / प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांचे संचालक / प्रमुख, विविध विद्या शाखांचे अधिष्ठाते, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक व सहाय्यक कुलसचिव

प्रत माहितीस्तव अग्रेषित:

१) समन्वयक, विद्यापीठातील कला, वाणिज्य, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
२) प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
३) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ
४) समन्वयक, परीक्षा विभाग
५) मा.कुलगुरु यांचे कार्यकारी सचिव
६) संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, कुलसचिव व परीक्षा नियंत्रकांचे स्वीय सहाय्यक

प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१) सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
२) सर्व सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग